आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३३ वा ● शनिवार दि. २२ जून २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


### काश्मीरमध्ये लवकरच महाराष्ट्र सदन उभारणार

मुंबई, : राज्य शासनाच्या वतीने काश्मीरमध्ये लवकरच महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. त्यादृष्टीने काश्मीरमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी विभागाच्या वतीने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

या संदर्भात मंत्री श्री.चव्हाण यांनी सांगितले की, जम्मू आणि काश्मीर सरकारने बडगाम जिल्ह्यातील इचगाम तालुक्यातील २.५० एकर (२० कॅनल) जमीन राज्य सरकारला तेथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी प्रदान केलेली आहे. जमीन खरेदीची प्रक्रिया महाराष्ट्र व जम्मू-काश्मीर सरकार यांच्या वतीने पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र सदन उभारण्याच्या दृष्टीने दोन्ही राज्यात आवश्यक प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा कामगार संघटना महासंघाचे निदर्शने.

विशेष प्रतिनिधी सोलापूरः राज्यात कामगार



मंत्री सुरेश खाडे यांचे कामगार विभागावर नियंत्रण नसल्यामुळे कामगारांच्या कल्याणकारी योजना व त्यांचे विकास आणि संरक्षण होत नाही. कामगार विभाग मंत्रालय मुंबई,राज्याचे कामगार आयुक्त कार्यालय आणि इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई आणि सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर कार्यालयात अधिकारी,कर्मचारी वेळेवर येत नाही.मनमानी लहरी पध्दतीने कामकाज चालू आहे.त्यामुळे शासनाने कामगारांसाठी लागू केलेले कल्याणकारी योजना व कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे शासनाचे मुळ उद्देश सफल होत नसल्याने कामगार मंत्री सुरेश खाडे यांची मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष साथी बशीर अहमद यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पुनम गेट येथे निदर्शने करत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांच्यामार्फत समक्ष भेटून निवेदन सादर करण्यात आले.

यावेळेस कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष साथी बशीर अहमद,शिवसेना कामगार आघाडी (शिंदे गट) चे अध्यक्ष सायबण्णा तेगेळ्ळी, शिवसेना कामगार आघाडी माळशिरस तालुकाध्यक्ष ज्ञानेश्र्वर देशमुख समता मजदूर युनियनचे अध्यक्ष साथी छगन पंढरे, संघर्ष कामगार संघटनेचे अंगद जाधव,राष्ट्रीय मुननिवासी बहुजन कर्मचारी संघाचे सिध्दार्थ बोराडे,मिलिंद गायकवाड,औद्योगिक कामगार सुरक्षा युनियनचे अशोक कांबळे,लेबर पार्टीचे जिल्हाध्यक्षा सत्यव्वा गायकवाड,रफिक तांबोळी,जनरल कामगार युनियनचे कॉ.एजाज शेख,बाबा बागवान,महाराष्ट्र राज्य लेबर युनियनचे महेबूब शेख,अशपाक शेख,रंगनी कामगार युनियनचे कॉ. शंकर तुम्मा, लेबर पार्टीचे कॉ. चंद्रकांत बदलापूरे,मुज्ञो पठाण,भिमशक्ती शिवशक्ती कामगार संघटनेचे साथी नितीन कांबळे,शिवाजी कांबळे, सुगतपाल कांबळे, नातेपुते कामगार संघटनेचे,राजु जाधव,संदीप भागवत,विकास बरडकर,राहुल बरडकर,नाना मोहीते,ज्ञानेश्र्वर देशमुख, सत्यशोधक कामगार संघटनेचे प्रदीप प्रकाळे,विजय शिकतोडे,मसूद कालबुके आदी विविध संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती महासंघाच्या प्रसिध्दी पत्रकात बशीर अहमद यांच्यावतीने देण्यात आली आहे. प्रदीप प्रकाळे ९३०९३५०९४० सोलापूर यांस कडून.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, (जिमाका) : राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शुक्रवार, २२ जून २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



ना. बनसोडे यांचे २२ जून रोजी सकाळी ६.२५ वाजता लातूर रेल्वे स्टेशन येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थानाकडे प्रयाण करतील व राखीव. सकाळी ९.३० वाजता लातूर येथून मोटारीने जळकोटकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता जळकोट येथील कुणकी रोडवरील तिरुमला मंगल कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जळकोट शहर व ग्रामीण बुथ मेळावा व कार्यकर्ता संवाद बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ५ वाजता नांदेड-बिदर रोडवरील श्री श्री डॉ. शंभुलिंग शिवाचार्य नगर येथे श्री सद्गुरु हावगी स्वामी शेतमळा येथे श्री श्री ष.ब्र. १०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठाचे मठाधिश यांच्या ५६ व्या वाढदिवस (गुरुगौरव) सोहळ्यास उपस्थित राहतील. सायंकाळी ६ वाजता संतोषीमाता नगर येथे श्री. सिध्देश्र्वर विनोद मिंचे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सायंकाळी ६.३० वाजता गांधी नगर येथे श्री. पंकज कांबळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सोईनुसार उदगीर येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण करतील. तसेच रात्री ११.३० वाजता लातूर येथून पुणेकडे प्रयाण करतील.

# शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योग महत्वपूर्ण - विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

अमरावती, : मानवी जीवनात योगासनाचे अनन्यसाधारण असे महत्व आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी तसेच निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगसाधना करावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी केले.

दहाव्या आंतरराष्ट्रीय योगदिना निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात विशेष कार्यक्रमाच्या आयोजनातून योग दिन सादरा करण्यात आला. योग शिक्षक मनिष देशमुख यांनी यावेळी उपस्थितांनी योग व ध्यानसाधनेचे फायदे सांगून योग प्रात्यक्षिके सादर केलीत. उपायुक्त संजय पवार, गजेंद्र बावणे, राजू फडके, रमेश आडे, संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, विशेष कार्य अधिकारी हर्षद चौधरी, राजेश आग्रेकर यांच्यासह आयुक्तालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आजची आपली जीवनशैली पूर्णपणे बदललेली आहे. आज प्रत्येकाला ताण-



तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये योगसाधनेचा समावेश करणे आवश्यक आहे. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मन:शांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने निरोगी जीवन जगण्यासाठी योगसाधना करणे आवश्यक आहे. असे योग शिक्षक श्री. देशमुख यांनी यावेळी सांगितले. त्यांनी योगसाधनेचे महत्व व विविध फायदे याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करुन योगासनाची प्रात्यक्षिके सादर केलीत. उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन योगासने केलीत.

प्रारंभी प्रार्थनेने योग प्रात्यक्षिकांची सुरुवात झाली. यावेळी योग पूर्व व्यायाम प्रात्यक्षिकासह प्राणायाम, कपालभाती, अनुलोम-विलोम, नाडी शोधन क्रिया, भ्रामरी हे योग प्रकार करुन घेण्यात आले. त्यानंतर ध्यानसाधना करण्यात आली. यावेळी योग शिक्षक श्री. देशमुख यांचा विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांच्याहस्ते पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रदर्शन नायब तहसीलदार श्याम देशमुख यांनी यावेळी केले.

# निरोगी आयुष्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक- जिल्हाधिकारी

लातूर, (जिमाका) : योग हा आपल्या देशाने जगाला दिलेला अनमोल ठेवा आहे. नियमित योगासनामुळे आपले तन आणि मन तांदरुस्त राहण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्यकाने नियमितपणे योगाभ्यास करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी बोलत होत्या. या कार्यक्रमात अंदाजे ६ हजार लातूरकर मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. जिल्हा प्रशासान, लातूर शहर महानगरपालिका यांच्यासह पतंजलि योगपीठ, प्रजापिता ब्रह्मकुमारी, आर्ट ऑफ लिव्हिंग सुप्रभात ग्रुप, नॅशनल योगासन स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया, योगासन भारत आदींच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'योग- स्वत:साठी आणि समाजासाठी' हे यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे बोधवाक्य असून त्यानुसार प्रत्येकाने स्वत:साठी योगाभ्यास केला पाहिजे, तसेच समाजातील इतरांनाही योगाचे महत्व सांगून योगाभ्यासासाठी प्रोत्साहित करून सामाजिक स्वास्थासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. योग ही एक जीवनशैली असून लहानपणापासूनच या जीवनशैलीचा अंगीकार केल्यास आपले पूर्ण आयुष्य संतुलित बनण्यास मदत होईल, असे त्या म्हणाल्या.



निरोगी आयुष्यासाठी ज्याप्रमाणे नियमित योगा आवश्यक आहे, त्याचप्रमाणे आपल्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्ष लागवडीची आवश्यकता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने एक व्यक्ती, एक झाड या संकल्पनेतून आपल्या शेतात, घरासमोर, रिकाम्या जागेत एक तरी वृक्ष लावावा. यंदा वटपौर्णिमा आणि आंतरराष्ट्रीय योग दिवस एकाच दिवशी आला असून महिलांनी वडाच्या झाडाचे पूजन करण्यासोबतच वडाचे एक झाड लावून त्याची जोपासना करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

प्रारंभी आयुष मंत्रालयाचे विकास पाटील यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उद्देश आणि योगाभ्यासाचे महत्व सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वडाच्या रोपाचे पूजन करण्यात आले. रुद्रा स्पोर्ट्सच्या चमूने यावेळी योगा नृत्य सादर केले. त्यानंतर योग मार्गदर्शक विष्णू भुतडा यांच्यासोबत उपस्थित सर्वांनी विविध योगासने केली. तसेच नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून जिल्हा क्रीडा संकुलपर्यंत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून योगाचे महत्व पटवून देण्यात आले. केशवराज माध्यमिक विद्यालय, देशिकेंद्र माध्यमिक विद्यालय, राजस्थान माध्यमिक विद्यालय, परिमल माध्यमिक विद्यालय, ज्ञानेश्र्वर माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक विद्यालय, शिवाजी माध्यमिक विद्यालय, सदानंद माध्यमिक विद्यालय, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, श्री श्री रविशंकर माध्यमिक विद्यालय, शारदा इंटरनॅशनल स्कूल, संत नामदेव माध्यमिक विद्यालय, यशवंत माध्यमिक विद्यालय, शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, जिजामाता कन्या प्रशालेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रभातफेरी आणि योगाभ्यासात सहभागी झाले होते.

# लातूर शहरातील सर्वच होर्डिंग्ज काढा म्हणणं मनपाचे अन्यायी धोरण - अधिकृत जाहिरात एजन्सीधारकांचे पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण

लातूर - लातूर शहरातील अधिकृत आणि अनधिकृत होर्डिंगजचा विचार न करता लातूर महापालिकेने सरसगट सर्व मालमत्ताधारक व जाहिरात एजन्सीधारकांना होर्डिंग्ज काढण्यासाठीच्या नोटीसा बजावल्या आणि गुन्हे दाखल केले. हे अत्यंत चुकीचे व अन्यायी धोरण आहे. मनपाने अधिकृत जाहिरात एजन्सीधारकांच्या परवान्याचे नुतनीकरणाचे प्रस्ताव एका रात्रीत रद्दबातल ठरवले असून पुन्हा नुतनीकरण प्रस्ताव आणि स्ट्रक्चरल ऑडिट मनपाकडे सादर करावेत, असे परिपत्रक काढले आहे. आणि दुसरीकडे अधिकृत असलेल्या शहरातील होर्डिंग्ज काढण्याची मोहिम सुरु ठेवली आहे. सदरची कार्यवाही थांबवण्यात यावी. अशी मागणी आज २१ जून रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान महात्मा गांधी चौक येथील रसिका हॉटेल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत जाहिरात एजन्सीधारकांनी संयुक्तरित्या मनपा व शासनाकडे केली आहे. या पत्रकार परिषदेला नेटीजन्स मीडिया सर्व्हीसेस अजय बोराडे पाटील, विशाल विकास बारुळे आणि इनेटिव्ह मीडियाचे योगेश गुंडावार आदी जाहिरात एजन्सीधाक आणि कायदेशीर सल्लागार ॲड. निलेश मुचाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.



सर्व नियमांचे पालन करून, मनपाचा रितसर परवाना घेवून व टॅक्स भरून ज्या स्ट्रक्चरर्स नियमित केल्या आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येवू नये, रिकाम्या स्ट्रक्चरमुळे काही अनुचित घटना घडली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सदारीज जाहिरात एजन्सीधारकांची राहिल, तसेच मनपाच्या नियमांचे आधीपासूनच पालन करून सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तसेच नुतनीकरणाचे प्रस्तावासाठी आपण सुचवलेली नवीन कागदपत्रे जसे की शासकीय यंत्रणेमार्फत केलेले स्टॅबिलिटी स्ट्रक्चरल सर्टीफिकेट देण्यासही आम्ही तयार आहेत. आणि त्या प्रमाणे सोलापूर तंत्रनिकेत महाविद्यालय यांच्याकडे मागणी करून त्यासाठी नियमानुसार फीसचा भरणा देखील केलेला आहे. लवाकर ऑडिट रिपोर्ट करून देण्याचे सदर महाविद्यालयाने मान्य केले आहे. लातूर मनपाने शहरातील परवानाधारक अधिकृत होर्डिंग्ज स्ट्रक्चरवर तुर्त कारवाई करू नये असे आज जाहिरात एजन्सीधारकांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे. शहरातील जाहिरात एजन्सीधारकांकडून शासकीय यंत्रणेकडून होर्डिंगजचे स्टॅबिलिटी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यात येत आहे. सदर जाहिरात व्यावसायावर हजारो कुटुंबाचे उदरनिर्वाह चालतात. स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सर्टिफिकेट घेवून ते दाखल करण्याचे कामही सुरु आहे. त्यामुळे मनपाने अधिकृत होर्डिंग्ज स्ट्रक्चरवरील तात्काळ कारवाई करण्याची मोहिम थांबवली पाहिजे. तसेच सर्व जाहिरातदारांना मनपा आयुक्तांनी समान न्याय द्यावा. शहरातील जाहिरात फलकांवरील फ्लेक्स काढून टाकण्यात आल्यामुळे याचा कसलाही धोका राहिलेला नाही. शिवाय जाहिरात एजन्सीधारकांनी शहरातील बहुसंख्य होर्डिंग्ज स्वता होवून काढून घेतलेल्या आहेत. तसेच सदर होर्डिंग्ज काढण्यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल असून येत्या ३ जुलै रोजी यावर सुनावणी होणार आहे. तुर्त लातूर मनपाने होर्डिंग्ज, बोर्ड काढण्याची मोहिम थांबवावी. अशी अपेक्षा आजच्या पत्रकार परिषदेत सदर जाहीरात एजन्सीधारकांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात सर्व मनपा व नगर परिषदांमध्ये होर्डिंग्जच्याबाबतीत जे नियम आहेत, तेच नियम लागू करून आमचे नुतनीकरण करून लवकरालवकर द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## आ अभिमन्यू पवारांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट... मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत तब्येतीची विचारपूस

औसा - मनोज जारांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस



करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी मनोज जरांगे पाटील यांची (दि.२०) जून रोजी गॅलक्सी हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन सदिच्छा भेट घेत आपली भूमिका मांडली.यावेळी मराठा आरक्षण व इतर प्रश्र्नांबाबत सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली.

या भेटीत सरकारबद्दल असलेली भावना मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली यावेळी आ. अभिमन्यू पवार यांच्या सोबत असलेल्या मराठा समाज बांधवांनी आ अभिमन्यू पवार मुख्यमंत्री कार्यालयात मुख्यमंत्र्यांचे पीए असल्यापासून आतापर्यंत मराठा आरक्षणाबद्दल केलेल्या कामाची माहिती मनोज जरांगे पाटील यांना दिली. अंतरवली सराटीला गेलेल्या शिष्टमंडळात माझाही समावेश होता पण एका पूर्वनियोजित सोयाबिन परिषदेसाठी इंदौरला जावे लागले तोही विषय शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या असल्याने मी तेंव्हा येऊ शकलो नव्हतो असे सांगून मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी राजकीय विरोधकांनी मागच्या काळात काही चूकीच्या बातम्या प्रसारित करुन समाजात गैरसमज पसरण्याचा प्रयत्न केला होता हि वस्तुस्थिती या भेटीत मनोज जरांगे पाटील यांना अवगत करून दिली...

जरांगे पाटलांच्या अटकेची मागणी ही केवळ अफवाच

आ. अभिमन्यू पवार यांनी विधानसभेत मनोज जरांगे पाटील यांना अटक करा अशी मागणी केल्याची अफवा समाज माध्यमावर पसरली होती. आपण अशी कुठलीही मागणी केली नसल्याचे पवारांनी जरांगे यांच्यासमोर स्पष्ट केले. तसेच काही लोक चुकीच्या अफवा पसरवून आंदोलनाचे नुकसान करत असून अफवा पसरवणाऱ्यांनी पुरावे सादर करण्याचे आवाहनही आ. पवार यांनी केले.

## संभाजी पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप व्यापारी आघाडी, शिवछत्रपती मार्केट यार्डतर्फे महाआरती

लातूर : लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार



संभाजीभैय्या पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी, शिवछत्रपती मार्केट यार्ड लातूर तर्फे श्री गौरीशंकर मंदिरात महाआरती करण्यात आली.

सर्वांना सोबत घेऊन चालणारे युवा नेते म्हणून संभाजी पाटील निलंगेकर यांची ख्याती आहे. त्यांच्याकडून सर्वसामान्यांच्या हिताची कामे निरंत्रपणे होत रहावीत . त्यांना उत्तम आरोग्य लाभावे व त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण व्हाव्यात यासाठी ही महाआरती करण्यात आली. भाजपच्या व्यापारी आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी अजय दुडीले, दीपक राठी, चिमेगावे अप्पा,आनंद अंकलकोटे, नितीन कोरे, चंद्रवर्धन खंदाडे, पांडुरंग बेडदे, भालचंद्र दानाई, मोहित पाटील गोंद्रीकर, जितेंद्र दासरे, पुरुषोत्तम बजाज,राचप्पा भरमाजे, किशन डागा, विकास गडगिले, ज्ञानेश्र्वर दळवे, ज्ञानेश्र्वर जाधव,शिवदास बिडवे ,विशाल पीरशेटे आदींची उपस्थिती होती .

## डीएलएड प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास २५ जूनपर्यंत मुदतवाढ

मुंबई, : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता डीएलएड (ऊएश्र.एव) प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी १८ जून २०२४ रोजीपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, बऱ्याच संस्था, लोकप्रतिनिधी व संघटनांनी मागणी केल्यामुळे हे अर्ज भरण्यासाठी २५ जून २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे राज्यस्तरीय डीएलएड प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी कळविले आहे.

या बाबतच्या सर्व सूचना, प्रवेशपात्रता इ. बाबी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे च्या ु.ारर. रल.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन अर्ज भरल्यानंतरचे फेरीनिहाय सविस्तर सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यासाठी उमेदवारांनी व शैक्षणिक संस्थांनी वेळोवेळी संकेतस्थळ पाहण्याची दक्षता घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मायलेकीच्या आत्महत्येला जबाबदार कोण ?

## संपादकीय...

नवीन शैक्षणिक धोरण, तात्काल अंमलबजावणी आणि शैक्षणिक संस्थेचा धुमाकूळ यामुळे सामान्य गरीब कुटुंबातील मुलं -मुलींना शिक्षण घेणे परवडत नसल्याने आपल्या मुला मुलींना शिक्षण देण्याची इच्छा असतानाही ती पूर्ण करू शकत नाही असा समज झाल्याने जर कुणा महिलेने किंवा पुरुषाने त्यांच्या लेकरासह आत्महत्या केली तर त्या कोण जबाबदार राहील- ठरले हे नवीन शैक्षणिक धोरण राबविणारे केंद्र व राज्य सरकार अशा गंभीर बाबीचा खुलासा करून स्वतःवर जबाबदारी घेऊन न्यायिक प्रणाली राबवीतील काय अशी संताप जनक प्रतिक्रिया सर्व स्तरातून व्यक्त होताना दिसते आहे.

शेळ्या राखून कुटुंबाची उपजीविका भागविणारे व्यंकट हालसे हे माळेगाव ता. निलंगा जि. लातूर येथील रहिवासी आहे दीड एकर जमीन असली तरी ती आई -वडीलाच्या ताब्यात आहे व्यंकट हालशे पत्नी भाग्यश्री भाग्यश्री, मुलगा सार्थक आणि मुलगी समीक्षा असा परिवार परंतु आई भाग्यश्रीची इच्छा सीबीएसई सुविधा असलेल्या शाळेत मुला-मुलींचे शिक्षण घ्यावे हीच पण परिस्थिती हालाखीचा त्यात शाळेचा खर्च त्यातून गुपचूप डोनेशन, शाळेला ये जा करण्याचा खर्च परवडणारा नाहीच पण शिक्षण देण्याची प्रांजल आणि आग्रही इच्छा आई भाग्यश्रीची होती पण पती व्यंकटराव ते पेलू शकत नव्हते तशी चर्चाही दोघात होत होती. पण आई भाग्यश्रीला आपण आपल्या मुलांना चांगल्या शाळेत सीबीएससी सुविधा मिळवून देऊ शकत नाही ही सलग टोचत होती आणि भाग्यश्रीने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला सार्थकला हाका मारूनही तो खेळाच्या नादात आहे भाग्यश्री कडे आला नाही पण समीक्षा आली आणि दोन्ही माय लेकींनी विहिरीत आत्महत्या केली हे शैक्षणिक धोरणाचे म्हणायचे काय अशी संतप्त प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

शिक्षणाशिवाय पर्याय नाही, विकास नाही, प्रगती नाही शिक्षणाशिवाय कुटुंबाचा, राज्याचा, देशाचा विकास होऊच शकत नाही परंतु हे शिक्षण सर्व घटकातील लोकांना परवडणारे असावे, गरिबासह धनदांडग्यांनाही एकच एक शिक्षण मिळावे त्यासाठी सरकारने पावले उचलली पाहिजेत . विज्ञान, तंत्रज्ञानाच्या नादात मराठमोळी शिक्षण असावेच लागते, आजवरच्या कला, वाणिज्य, विज्ञान या शिक्षणावर भारत सुजलाम-सुफलाम बनला असताना एकाच छताखाली-एकाच वर्गात सर्व काही शिक्षणाचा गुंडाळा करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना काय साध्य करायचे आहे हेच कळत नाही इतरांची सल्ला न घेता हुज-यांच्या सहमतीने शैक्षणिक धोरण ठरवून सर्वसामान्य गरीब कुटुंबांना संपवायचे दुष्ट कारस्थान घाटकी ठरावे अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटताना दिसते आहे.

पाण्यात दूध-साखर, चहा पत्ती टाकून ते उकळून चहा म्हणून देण्यासारखे शिक्षण नसतो, शासन, प्रशासन, आरोग्य, विज्ञान, वाणिज्य, उद्योग, व्यवसाय, अन्नवस्त्राला पूरक असे शिक्षण असावे लागते. सीबीएसई योजना वाईट नाही पण ती सर्वांसाठी खुली-माफक असावी शेळ्या राखून किंवा मॉल मजुरी करून उपजीविका भागविणाऱ्यांना अशी महागडी शिक्षण व्यवस्था काय कामाची हाही विचार सरकारने करणे गरजेचे वाटते. टोलजंग इमारती, भरमसाठ पगारी घेऊन शिक्षण देणारे कर्मचारी, नोकरभरती-डोनेशन मधून कमाई करणारे संस्थाचालक सरकारी शाळेचे खाजगीकरण करून दुसऱ्याची भरपाई करणारे असले चांडाळ सरकार काय कामाचे अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत असली तरी सीबीएसई प्रवेशासाठी आत्महत्या केलेली भाग्यश्री व समीक्षा परत मिळणार आहे काय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी किंवा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जबाबदारी स्वीकारून शिक्षणाचे दरवाजे मोफत खुले करतील काय अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

## झरोका

एक - मराठा आरक्षण, कुणबी, सगळे सोयऱ्याची नोंद यावर मनोज जरंगे पाटील ठाम आहे. तर मंत्री छगन भुजबळ ही ओबीसी आरक्षणासाठी टोकाची भूमिका घेऊनच सरकारमध्ये आहे यातील गौडबंगाल काय आहे हेच कळत नाही डोकं बधिर झाले.

दुसरा - अरे, मराठा-कुणबी आरक्षणाबाबत जरंगे यांना छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शब्द दिला. आरक्षण जाहीर केले पण ते न्यायसंस्थेत टिकू शकत नाही हे माहीत असतानाही ते लागू केले पण ओबीसी मधूनच आरक्षण हा वाद चव्हाट्यावर आला छगन भुजबळ हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आहेत. परंतु अजित पवार यांनी मराठा आरक्षणासंदर्भात पाठिंबा ना विरोध न करता सावध आहेत. भुजबळ हे अवघड विषय आहे त्यामुळे ते बघणारच नाहीत मग काय.

एक - अहो, असं कसं म्हणता, ओबीसी आरक्षणासह मराठा आरक्षण ही लागू करावेच लागेल तर सरकार टिकेल अन्यथा अवघड आहे.

दुसरा - अरे, बिहार सरकारने वाढीव आरक्षण दिले होते ते रद्द झाले आहे मग महाराष्ट्र सरकारने मराठा आरक्षण जाहीर केले तेही रद्द होणारच आणि त्याचा उद्याच्या विधानसभा निवडणुकीवर परिणाम होणारच म्हणूनच भुजबळ-जरांगे यांच्या वादात सरकार पडणारच नाही न्यायालयाकडे बोट दाखवून गाडी हाकली जाणार एवढेच .

एक - अहो, मग आरक्षणाचे काय, मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष होईल त्याचे काय.

दुसरा - अरे, सर्वच राजकीय पक्षांना मराठा, ओबीसी, मागासवर्गीय अल्पसंख्यांक समाजाची गरज असतेच उद्याच्या विधान सभा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होईपर्यंत जरंगे-भुजबळ अशी लढत तेवेत ठेवून पुढच्या पुढे काय ते बघू म्हणून भाजपा-कॉँग्रेस, सेना राष्ट्रवादीचे नेते हातात हात घालून कोणी सत्ताधारी कोणी विरोधक म्हणून कार्यरत राहतील राजकारण-आरक्षणाला रान मोकळेच.

## काय बोलता राव ?

कॉँग्रेस-महाविकास आघाडीचा धसका भाजपा पक्षश्रेष्ठीने घेतला. असून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सामूहिक जबाबदारीने कार्यरत रहा अशी तंबी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्याने महाराष्ट्रातील नेते सावध झाल्याचे चित्र दिसते आहे.

**काय बोलता राव,**

अरे, लोकसभा निवडणूक महाविकास आघाडीचा विशेषतः शरद पवारांना रहा देण्यासाठी भाजपा महायुतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या डझनभर सभा घेतल्या पण महायुतीला महाविकास आघाडीने खबाडा दिलाच त्यात पुन्हा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची पक्ष वाढीसाठी उपमुख्यमंत्री पदावर मुक्त करा ,मोकळे करा ही नौटंकी म्हणजे एकाला चलो रे ची सांगावा असल्याचे भाजप श्रेष्ठीच्या लक्षात आले आणि सरकार मध्ये राहूनच सामूहिक जबाबदारीने काम करा अशी तंबीच देवेंद्र फडणवीस यांना विनोद तावडे, पंकजा मुंडे वगैरे समक्ष दिल्याने भाजपात खळबळ माजली असून शिंदे गट प्रबळ होताना दिसतो आहे मग बोला दाजीबा.

## दुष्काळग्रस्त गावकऱ्यांना रामचंद्र सालेकर यांनी दिली जलसंजीवनी.

प्रतिनिधी - वरोरा तालुक्यातील महाडोळी गटग्रामपंचायत अंतर्गत शेगांव (खुर्द) हे पाणी टंचाईने अतिशय व्याकुळ असलेले गांव. अनेकवर्षांपासून पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करून करून अखेर जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची टाकी तथा नळ योजना मंजूर झाली.परंतु पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याकरिता ग्रामपंचायत जवळ सरकारी मालकीची जागा नसल्याने सदर योजना परत जाणार की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली.अखेर त्याच गावचे मूळ रहिवाशी,पेशाने शिक्षक,२००७ मध्ये जिल्हा परिषद चंद्रपूरने आदर्श उत्कृष्ठ शिक्षक म्हणून सन्मानित केलेले, मराठा सेवा संघाच्या चळवळीत वाढल्याने नेहमीच समाजसेवेची उत्तकंठा असलेले,एक सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र सालेकर यांनी गावाचे हित लक्षात घेता,सामाजिक बांधिलकी जपत पाण्याच्या टाकीच्या बांधकामाकरिता कसलाही आर्थिक मोबदला न घेता स्वतःच्या शेतातील ६२५ चौ.फूट जागा ग्रामपंचायतला दानपत्र करून बक्षिस दिली व रखडलेली योजना मार्गी लावली. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत असून त्यांचे आभार व्यक्त करत आहे. आपण गावाकऱ्यांना एकप्रकारे जलसंजीवणी देऊन छोटंसं समाजऋण फेडल्याचं समाधान असल्याची प्रतिक्रिया रामचंद्र सालेकर यांनी व्यक्त केली.

**रामचंद्र सालेकर ९५२७१३९८७६, (राज्य उपाध्यक्ष )**
**शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद महाराष्ट्र**

## आगामी विधानसभा निवडणुकांना सर्व ताकदीनिशी सामोरे जावे भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : लोकसभा निवडणूकीत भाजपा आघाडीने विजय प्राप्त केला असून पुन्हा एकदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाले आहेत. मात्र, या निवडणुकीत काही मतदारसंघामध्ये पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले असून या पराभवाचे चिंतन आणि मंथन करत निवडणूकीत झालेल्या चुका दुरूस्त करून आगामी विधानसभा निवडणुकीला एकदिलाने व एकजुटीने व सर्व ताकदीनिशी सामोरे जावे असे आवाहन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर लोकसभेचे निरीक्षक विक्रम पावसकर यांनी केले.

प्रदेश भाजपच्या सूचनेनुसार लोकसभा निवडणुकीतील परिस्थितीचे आकलन व त्याबाबतचा आढावा घेण्यासाठी लातूर येथे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर हे निरीक्षक म्हणून आलेले होते. त्यांच्या उपस्थितीत लातूर येथील इशान स्क्वेअर येथे मतदारसंघातील प्रत्येक विधानसभेच्या कोअर कमिटीसह प्रमुख पदाधिकाजयांची बैठक पार पडली. यावेळी पावसकर बोलत होते.या प्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी खा. सुनिल गायकवाड, प्रदेश सरचिटणीस तथा लोकसभा प्रभारी किरण पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांचीउपस्थिती होती. या बैठकीच्या सुरूवातीस देशाच्या पंतप्रधानपदी तिसजयांदा नरेंद्र मोदी विराजमान झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी मांडला. या ठरावास जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांच्यासह महिला मोर्चाच्या



जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे व शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव यांनी अनुमोदन दिले. यावेळी उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात या ठरावास मान्यता दिली.भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष असून राष्ट्र प्रथम हा संस्कार पक्षाने रुजविलेला असून या संस्काराच्या आधारे आणि गत दहा वर्षात केलेल्या विकास कामांच्या बळावर भारतीय जनता पक्ष नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीला सामोरे गेला असल्याचे विक्रम पावसकर यांनी सांगितले. जनतेच्या आशा, आकांक्षा पूर्ण करायाचा प्रामाणिक प्रयत्न करीत लोकहिताच्या अनेक योजना मोदी सरकारने राबविलेल्या होत्या. त्यामुळेच देशातील जनतेने पुन्हा एकदा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नावावर पसंतीची मोहोर उमटवली असल्याचे पावसकर यांनी स्पष्ट केले. मात्र काही मतदारसंघात जनतेत संभ्रम निर्माण करणारा प्रचार करून कॉँग्रेस व इंडी आघाडीने असभ्य राजकारण केली असल्याची टीका पावसकर यांनी केली. खोटे बोल पण रेटून बोल असे करत लोकशाहीची थट्टा करण्याचे काम इंडी आघाडीने केले असल्याने काही मतदारसंघात भाजपाला पराभवास सामोरे जावे लागले आहे.

मात्र, या पराभवामुळे भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खचून न जाता पुन्हा एकदा एकदिलाने, एकजुटीने व सर्व ताकदीनिशी आगामी विधानसभा निवडणुकीस सामोरे जावे, असेआवाहन करून सबका साथ सबका विश्र्वास आणि सबका विकास या उक्तीप्रमाणे काम करावे असे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर केंद्र व राज्य सरकारने केलेली लोकहिताची कामे व विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्याशी संपर्क साधल्यास विजय निश्र्चित होईल, असा विश्र्वास व्यक्त करत आगामी निवडणुका जिंकण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी करावा, असे आवाहन पावसकर यांनी केले.

यावेळी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची समिक्षा करून त्याची पुनरावृत्ती आगामी निवडणुकांमध्ये होणार नाही याची दक्षता पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घ्यावी, असेआवाहन करून पक्षाची ध्येय धोरणे व केंद्र व राज्य सरकारने केलेली कामे प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी बूथरचना अधिक व्यापक व सक्षम करावी, असे सांगितले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील कोअर कमिटी सदस्य व पदाधिकाजयांशी वैयक्तिक चर्चा करतआगामी विधानसभा निवडणुकीसाठी काय रणनिती असावी याबाबतची मते जाणून घेतली. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावाही त्यांच्याकडून घेतला.

## मुंबई विद्यापीठाने मंदिर व्यवस्थापन हा व्यावसायिक कोर्स सुरु करून मंदिर हा व्यवसायच असल्याचे केले सिद्ध.- रामचंद्र सालेकर

आजपर्यंत विद्यापीठांमधून शिक्षण हे व्यावसायीक कोर्सचे दिल्या जाते एवढं मला माहित होतं परंतु मुंबई विद्यापीठाने मंदिर व्यवस्थापन कोर्स निर्माण करून मंदिरं हा सुद्धा व्यवसायच असल्याचे आज मलाच नव्हे तर संपूर्ण भारतीयांना कळलं. तुमच्या मुलांचे मेंदू गुलाम करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे हे पहीलं पाऊल, विद्यापीठाचे नव्हे तर सनातन्यांचे हे पहिले पाऊल आहे. याचे कारण भारतातल्या सर्व विद्यापीठाचे ९० टक्के कुलगुरु हे सनातनी ब्राम्हणवादी आहे,एवढी हिंमत होण्याचं कारण सरकारही सनातनी असल्याने वाटेल ते निर्णय ते घेऊ शकतात.यापुढे कदाचित संपूर्ण भारतभरातील विद्यापीठात हा कोर्स सुरु होईल.

बरं मंदिरालाच व्यवस्थापनाची गरज आहे का ? मज्जीद,चर्च,गुरुद्वारा,विहाराला व्यवस्थापनाची गरज नाही का? हिंदूंना गुरुद्वारा विहारात मज्जीद चर्च मध्ये जायची बंदी नाही,बिना कोर्सचं तिथलं व्यवस्थापन बघून,तिथला आदर्श हिंदूंनी घेतला तरी पुरेसे आहे.बरं मंदिराचा व्यवस्थापक कोण राहील? तर याच उत्तर ब्राह्मण पुरोहितच आणि झाडू मारायला तेली माली कुणबी मराठा.आज समाज जागृतीमुळे मंदिरात झाडू मारणारे मिळत नसल्याने हे पाऊल उचलले असावे की काय !. एवढं मात्र नक्की. बेकारीची बिकट समस्या,शासकीय संस्थातील नोकऱ्या मिळणं दुरापास्त,आता एकच उपाय या अभ्यासक्रमाच्या नावानं या युवकांच्या हाती मंदिराची घंटा व झाडू द्यायचा व रोजगार दिल्याचा आव आणायचा,मुळात हा कोर्स कोणासाठी आहे? अर्थात विद्यापीठाचा कोर्स म्हटल्यावर सर्वांसाठी असेल, हा कोर्स करून एखाद्m sc st obc... ला पुजारी बनता येणार का? हा प्रश्न मात्र अनुत्तीर्ण आहे. मंदिर व्यवस्थापन कोर्स मध्ये पुजारी बनण्यासाठी लिंगाीलल यांना मंत्र तंत्र आरत्या पूजा कसी करायची हे शिकवणार काय? कोर्स पूर्ण केल्यास पुजारी म्हणून त्यांची नियुक्ती देईल का? मुलींसुद्धा हा कोर्स करू शकणार तेव्हा स्त्रियांना पुजारी बनवणार का? की गाभाऱ्याच्या बाहेर त्याच्या हाती घंटा आणि झाडूच असेल? बरं यासाठी कोर्स ची काही गरज नाही, बिना कोर्स ने बखुबी लिंगाीलल घंटा वाजवत आहे,झाडझूड करत आहे, बिना कोर्स ने दान पेट्यातले पैसे मोजू शकते, दंडे घेऊन रांगा ही सांभाळू शकते. हे सगळं आजपवेतो होतच आहे की,आज भक्तीच्या नावाने अनेक बुजुर्ग बिना मोबदला मोठं मोठया मंदिरात सेवा देत आहे,त्यांची लंबी यादी झाडू मारायलाही वेटिंगवर असते.मग हा कोर्स कोणाच्या सुपीक डोक्यातला होय. यावर चिंतन केलं असता काही बाबी प्रखर्शाने जाणवते.

१) या कोर्स ला प्रामुख्याने पुरोहित वर्ग त्यांचीच मुले पाठवणार.२) त्यांची दानदक्षिणा व्यतिरिक्त पदवी असल्याने सरकारी पगाराची नोकरी तिथे पक्की होणार.३) इतरांनी कोर्स केला तरी नोकरी देतांना निवडमंडळात ब्राह्मण पुरोहितच असणार तिथे आरत्या मंत्र तंत्र वेद गीता पुरानातले अध्याय विचारून त्यांना डावलणार.४) इतरांनी जाण्याचा प्रयत्न केलाच तर त्यासाठी कॅट्यागिरी असणार गेवोगांवी हिंडून मंदिर महात्म्य जनजागरण प्रसिद्धी व्यवस्थापन, मंदिर निर्माण व्यवस्थापन, मंदिर परिसर व्यवस्थापन,भक्त निवास व्यवस्थापन,सभामंडप व्यवस्थापन,सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्थापन,अर्थ व्यवस्थापन,मंदिर गाभारा व्यवस्थापन, पूजा व्यवस्थापन,... यापैकी त्याला कुठे नोकरी द्यायची हे ते ठरवणार.५) sc st obc तथा महिलांना गाभाऱ्यात पूजा,अर्थ व्यवस्थापनात हा कोर्स करूनही नोकरी मिळणार नाही. यांच्याकडे वर्गणी गोळा करून मंदिर निर्माण व्यवस्थापन सोपविल्या जाईल,सरकारी नोकरी व मंदिरं बांधायच्या दिलेल्या टार्गेटचं दडपण त्यामुळे तुम्ही मंदिर उभारणीच जिकरीने काम करणार व त्यांच्या धंद्याला व्यवसायाला भरभराटी आणणार,गाडगेबाबानी सांगून कळलं नाही परंतु विद्यापीठाने सुरु केलेल्या या कोर्समुळे तरी तुम्हाला नक्की कळलं असेल की मंदिरं हा भटांचा व्यवसाय आहे,धंदा आहे. या व्यवसायात तुमच्या हाती मात्र झाडू आणि घंटाच एवढं मात्र नक्की...

बहुजनांनो जागे व्हा अन्यथा घंटा वाजवतच बसाव लागणार हे मात्र नक्की.

**रामचंद्र सालेकर- ९५२७१३९८७६, (राज्य उपाध्यक्ष )**
**शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद महाराष्ट्र**

## वेठीस धरणे म्हणजे नेमके काय याचा मा. पुणे आयुक्त साहेब याचे स्पष्टीकरण करतील काय - जितेंद्र सातव यांची मागणी

मुंबई (रवींद्र मालुसरे ) - रुग्णालयांना आणि डॉक्टरांना वेठीस धरणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करू असे दिनांक २० जून रोजी पुणे पोलीस आयुक्तांनी समाज सेवक तसेच रुग्ण नातेवाईकांना संबोधून केलेले विधान केले आहे. या विधानावर पुणे शहरात विविध क्षेत्रात प्रतिक्रिया उमटल्या आहेत. तर वेठीस धरणे म्हणजे नेमके काय? तसेच बिलामध्ये सवलत मिळवून देण्यासाठी समाजसेवकांकडून वेगवेगळ्या युक्त्या लढवल्या जातात म्हणजे नेमके काय ? याचे स्पष्टीकरण मा. पुणे पोलीस आयुक्त साहेबांनी सर्व समाजसेवकांना, रुग्णसेवकांना व रुग्ण नातेवाईकांना द्यावे कारण या विधानाने सर्व समाजसेवक, रुग्णसेवक व नातेवाईकांमध्ये संभ्रमाचे वातावरण सध्या निर्माण झाले आहे.राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे वैद्यकीय मदत कक्षाचे महाराष्ट्र राज्यप्रमुख जितेंद्र सुरेश सातव यांनी पोलीस पुणे आयुक्त मा. अमितेश कुमार यांना निवेदन देऊन खुलासा करण्याविषयी आवाहन केले आहे.

सातव यांनी पाठविलेल्या निवेदनात गरीब आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याविषयी पुढील प्रमाणे भूमिका मांडली आहे, एखादा गरीब रुग्ण रुग्णालयात दगावला आणि त्याच्या नातेवाईकांची बिल भरण्याची परिस्थिती नसेल अश्या परिस्थितीत जर नातेवाईक किंवा समाजसेवाकांनी हॉस्पिटल प्रशासनाकडे बिलात सवलत मागितली तर तो गुन्हा आहे का? किंवा ते वेठीस धरणे असे होते का ? सवलत मागणारा कोण जो मोलमजुरी करून पोट भरतो, जो १० ते १५ हजार पगारावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो, जो शेतकरी कुटुंबातून अगर जो बिगारी कामगार असतो त्यांची अडचण दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. अनेक वेळा पोलीस बांधवांच्या मदतीला देखील आम्ही धावून गेलो आहोत. अनेक वेळा रुग्णालययाला सुद्धा अडीअडचणीच्या काळात मदत करत असतो.

जर नातेवाईकांनी डॉक्टरांना आपल्या रुग्णावर नेमके काय उपचार चालू आहेत. त्याची प्रकृती कशी आहे. हे काळजीपोटी विचारणे म्हणजे वेठीस धरणे होते का? आम्ही फक्त बिलिंग काउंटरला हॉस्पिटलचे सर्रास जास्तीचे बिले भरत राहायचे का ? आम्ही आमच्या रुग्णाविषयी डॉक्टरांना प्रश्न नाही करायचे का? असा प्रश्न सध्या आयुक्तांच्या या भूमिकेने सर्व रुग्ण नातेवाईकांना सध्या पडलेला आहे. त्यामुळे मा. पोलीस आयुक्त साहेबांनी याचे देखील स्पष्टीकरण द्यावे. कारण उद्या डॉक्टर किंवा हॉस्पिटल प्रशासनाची साधी भेट जरी घेतली तरी ते संबंधित समाजसेवक, नातेवाईकांवर कारवाईची मागणी करू शकतात. अश्या परिस्थितीत समाजसेवकांनी व रुग्ण नातेवाईकांनी नेमके काय करावे. हा देखील मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यामुळे वेठीस धरणे म्हणजे नेमके काय याचे स्पष्टीकरण सर्व रुग्णसेवकांना समाजसेवकांना तथा रुग्णनातेवाईकांना समजणे गरजेचे आहे.

जेव्हा लोकप्रतिनिधी एका कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर हात उचलतात तेव्हा मा. पोलीस आयुक्त कुठे होते ? की कायदा फक्त गोरगरिब जनता, समाजसेवक, रुग्णसेवक यांच्यावर कार्यवाही करण्यापुरताच आहे का ? हा देखील प्रश्न याठिकाणी निर्माण होतो. समाजसेवकांनी गोरगरीब रुग्णांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आणि तो अजामीन पात्र गुन्हा होतो का? आणि होत असेल तर मा. आयुक्त साहेबांनी त्यांच्या स्तरावर समिती तयार करून कायद्याच्या चौकटीत रुग्ण सेवेचे काम हाती घ्यावे व गोरगरीब रुग्णांना न्याय मिळवून द्यावा.

मा आयुक्त साहेबा रुग्ण सेवा करताना समाजसेवक रुग्णसेवक कायद्याच्या चौकटीत राहून अडचणीतल्या रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करीत असतात. उदा. गोरगरीब निर्धन रुग्णाला रुग्णालयामधून चारिटी अंतर्गत खाटा उपलब्ध करून देणे, महात्मा ज्योतिबा फुले विमाआरोग्य योजनेअंतर्गत उपचार करून देणे, रुग्णालयाकडून लावलेले जास्तीचे बिल हॉस्पिटल प्रशासनाला विनंती करून कमी करून देणे, नवीन आलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता आम्हा समाजसेवक, रुग्णसेवकांच्या निदर्शनास असे आले की मा. आयुक्त साहेब आपणाला रुग्णांसंबंधित विविध शासकीय योजनांची माहिती नसावी.

शासनाच्या वेगवेगळ्या योजना असून सुद्धा त्यांना सांगितले जात नाही, जे ऑपेरेशन व उपचार मोफत होत असून सुद्धा त्यासाठी त्यांना पैसे भरावे लागतात. हे जेव्हा समाजसेवकांडे येतात तेव्हा समाजसेवक त्यांच्या सोबत जाऊन हॉस्पिटल मध्ये त्यांना, त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत करतात. कोरोना काळामध्ये सुद्धा आपले रुग्ण सेवक जे समाजसेवक म्हणून रात्र दिवस घरा बाहेर पडून प्रत्येक रुग्णाला जी काही लागेल ती मदत करत होते तेव्हा कोणी दखल घेतली नाही. रुग्ण सेवक जे खरे आपले समाजसेवक आहेत त्यांनी रुग्णांच्या अडचणी समजून घेऊन गोर गरिबांना मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. हॉस्पिटल मध्ये जास्तीचे लावलेले बिल, औषधांचा अधिक खर्च, तपासणीसाठी लागणारा अती खर्च, बेडचा खर्च घेतला जातो त्या वेळी समाजसेवक यात मध्यस्थी करून त्याला बिलात सवलत मिळवून देण्यासाठी आहोरात्र प्रयत्न करतात. जे धर्मादाय अंतर्गत राखीव खाटा असून तसेच ५०% सवलत, विविध शासकीय योजना अथवा ट्रस्ट असून सुद्धा ह्या विविध योजनेची कल्पना रुग्णांना देत नाहीत तसेच हॉस्पिटल आवारात त्याचा बोर्ड लावत नाही , त्यामुळे रुग्णांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळत नसल्यामुळे त्यांना त्याचा लाभ घेता येत नाही.अशा वेळेला समाजसेवकच सगळी माहिती देऊन त्यांना योजनेचा लाभ करून देऊन बिलात सवलती करून देतात. एखादा रुग्ण जेव्हा अतिदक्षता विभागामध्ये असतो तेव्हा पूर्ण पैसे भरले नसल्यामुळे त्याचे उपचार थांबवले जातात, रुग्ण अतीदक्षते मध्ये असल्यामुळे रुग्णांचे नातेवाईक घाबरून जातात तेव्हा हेच समाजसेवक विविध योजना व मिळेल तिथून निधी गोळा करून रुग्णाला मदत करतात. एखादा रुग्ण जर डॉक्टरांच्या काही चुकांमुळे जर रुग्ण दगावला गेला तर ते नातेवाईकांना ह्याची कल्पना देत नाही ते लपवले जाते , का तर रुग्णालयाचे नाव खराब होऊ नये म्हणून. अस होऊन सुद्धा बिल पूर्णपणे न भरल्यामुळे शव त्यांच्या ताब्यात देत नाही तेव्हा रुग्णालय रुग्णाच्या नातेवाईकांना वेठीस धरतात. पण अशा वेळेला समाजसेवक मध्यस्थी घेऊन डेड बॉडी मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. काही रुग्ण असे आहेत ज्यांना कोणी ही वाली नाही, पण ते शारीरीक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असतात त्यांना आपण शक्य असेल ती विविध योजनेच्या माध्यमातून आपले समाजसेवक त्यांना लाभ करून देतात. नियमबाह्य प्रॅक्टिस, औषध कंपन्यांचा दबाव आणि लागेबांधे आणि महागडे वैद्यकीय शिक्षण यामुळे वैद्यकीय क्षेत्रात सुरू असलेली अनागोंदी यात सर्वसामान्य गरीब रुग्णाची बाजू घेण्यासाठी समाजातूनच व्यवस्था असायला हवी यासाठी काळाची गरज म्हणून सामाजिक भावनेतून दिवसरात्र राबण्यासाठी रुग्णसेवकाची समाजाला गरज आहे. जो हॉस्पिटल आणि रुग्णांचे नातेवाईक यांच्याशी समन्वय साधण्याचा मार्ग काढू शकेल.

## योगाला आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक माना - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी योगाला जगभर प्रसिद्धी मिळवून दिली. त्यामुळे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात साजरा केला जात आहे. केवळ फोटोपुरते योग न करता योग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक मानून रोज योग करून निरोगी राहण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गेट वे ऑफ इंडिया येथे मुंबई पोर्ट आणि इतर केंद्रीय संस्था, योग संस्थातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित योगसत्रात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पवन बायेकर, जी.बी. मोरे यांच्यासह होमगार्ड, एनसीसी कॅडेट, अधिकारी, कर्मचारी, योग संस्थांचे योग गुरू उपस्थित होते.

**नॅरेटिव्ह ..**

आजकाल नॅरेटिव्ह
शब्द किती गाजतो
प्रत्येक प्रवक्तामुखी
भोंगा रोज वाजतो
खरवडतात खपली
सुप्त इसब खाजतो
वादविवाद भडकले
कसेबाजार माजतो
कळत नाही अर्थही
तरीहीकोण लाजतो
तापला चला तवा रे
मीही पोळी भाजतो
मस्तवाल तोकोंबडा
खाटीकांशी झुंजतो
ताठा कसा बोलण्यां
अहंकाराने स्फुंजतो
चॅनेलवर किंचाळतो
तोचं तो येई रोज तो
चुका करी शिशूपाल
आम्ही फक्त मोजतो
जुना शब्द वापरांनी
शेवटी पुरता झिजत
नव्यादमात नवशब्द
नव वर्षांवा भिजतो

**कालानुरूप ..**

बदलत आहे पिढी
आता कालानुरूप
डॅडा पॉपस् बनले
पूर्वी होते तिर्थरुप
वडिलांचा रे दरारा
आधी कडक खूप
बाबा घरात येताचं
सारेहोती चिडीचूप
पुस्तकां घाला डोके
अभ्यास हो गुपचूप
बोलायची टाप नसे
तोंडाला बसे कुलूप
आत्ता पप्पा फ्रेंडली
स्नेहाळ मधाळ रुप
सोबत मारता गप्पा
मुलांना किती हुरुप
डिडा खेळे मुलांशी
होऊन अगदी तद्रूप
खेळीमेळीदंगामस्ती
दुःख पळवले विद्रूप
बाहेरून बाबा भिन्न
अंतरी स्नेहाळ रूप
मोहरू जाई आयुष्य
उजळे सुगंधित धूप

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# मृगबहार २०२४-२५ साठीजिल्ह्यातील फळपिकासाठी विमा योजना लागू

लातूर, (जिमाका) : मृग बहार २०२४-२०२५ मध्ये लातूर जिल्ह्यातील डाळींब, लिंबू, पेरु, सिताफळ व चिकू या पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेतंर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना २०२४-२०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्यामध्ये अधिसूचित तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेत शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

योजना कार्यान्वित करणारी बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे ही विमा कंपनी शासनाच्या महावेध प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या हवामान केंद्राने नोंदविल्या गेलेल्या हवामानाच्या तपशिलानुसार विमा योजनेत भाग घेतलेल्या शेतकऱ्यांना परस्पर नुकसान भरपाई देईल. जिल्ह्यामध्ये सदर योजना या विमा कंपनीमार्फत कार्यान्वित केली जात आहे.

डाळींब या फळपिकासाठी अहमदपूर तालुक्यातील किनगाव, अहमदपूर, खंडळी, उदगीर तालुक्यातील नागलगाव, हेर, औसा तालुक्यातील औसा, लामजना, किनीथोट, किल्लारी, बेलकुंड, भादा, चाकूर तालुक्यातील चाकूर, नळेगाव, वडवळ नागनाथ, निलंगा तालुक्यातील निलंगा, औराद शहाजनी, रेणापूर तालुक्यातील कारेपूर, पानगाव महसूल मंडळांचा या योजनेत समावेश आहे. तसेच डाळिंब या पिकासाठी पीकविमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै, २०२४ पर्यंत आहे. या फळपिकासाठी विमा संरक्षित रक्कम १ लाख ६० हजार रुपये असणार आहे. शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम ८ हजार रुपये राहील.

चिकू या फळपिकासाठी अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर महसूल मंडळाचा समावेश असून या फळपिकासाठी पीकविमा हप्ता भरण्याची अंतिम ३० जून, २०२४ राहील. तर विमा संरक्षित रक्कम रुपये ७० हजार रुपये आणि शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम ३ हजार ५०० रुपये राहील.

पेरु या फळपिकासाठी अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर, खंडाळी, शिरुर ताजबंद, हाडोळती, औसा तालुक्यातील मातोळा, उजनी, जळकोट तालुक्यातील घोणसी, जळकोट महसूल मंडळात विमा योजना लागू आहे. या फळपिकासाठी पीकविमा हप्ता भरण्याची अंतिम तारीख २५ जून, २०२४ राहील. तर विमा संरक्षित रक्कम रुपये ७० हजार रुपये आणि शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम ३ हजार ५०० रुपये राहील.

लिंबू या फळपिकासाठी उदगीर तालुक्याला हेर महसूल मंडळाचा समावेश असून या पिकासाठी पीक विमा हप्ता भरण्याची अंतिम तारीख २५ जून, २०२४ राहील. विमा संरक्षित रक्कम ८० हजार रुपये आणि शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम ४ हजार रुपये राहील.

सिताफळ या फळपिकासाठी अहमदपूर तालुक्यातील शिरुर ताजबंद, औसा तालुक्यातील उजनी, बेलकुंड, चाकूर तालुक्यातील आष्टा, निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी, रेणापूर तालुक्यातील रेणापूर, पळशी, पोहरेगाव, पानगाव, कारेपूर, लातूर तालुक्यातील हरंगुळ बु., कन्हेरी, मुरुड बु. महसूल मंडळाचा समावेश राहील. या फळपीकविमा हप्ता भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै, २०२४ राहील. तर विमा संरक्षित रक्कम ७० हजार रुपये आणि शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम ३ हजार ५०० हजार रुपये राहील.

कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक असून कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत भाग घेणे अथवा न घेण्याबाबत संबंधित बँकेकडे विहीत नमुन्यात घोषणापत्र व अर्ज सादर करावा. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी विहीत मुदतीत बँकेत किंवा आपले सरकार सेवा केंद्र येथे ऑनलाईन फळपिक विमापोर्टल ु.षिलू.र्सी. ळप वर सहभाग नोंदवावा. त्यासाठी अर्जदाराने आपल्या अर्जासोबत अधारकार्ड, आधार नोंदणी प्रत, जमिनधारक सातबारा, आठ अ उतारा व फळबागेचा (जिओ टॅगिंग) केलेला फोटो, भाडेपट्टा करार असलेल्या शेतकऱ्यांचा करारनामा, सहमतीपत्र आणि बँक पासबुक प्रत सादर करुन प्रत्यक्ष इलेक्ट्रॉनिक साक्षांकन करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती माहितीसाठी विमा कंपनीच्या १८०० २०९ ५९५९ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव यांनी केल आहे.

# खरीप पिकांसाठी १ रुपया विमा हप्ता भरुन प्रधानमंत्री विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : खरीप हंगामातील पिकांसाठी प्रधानमंत्री विमा योजनेतंर्गत १ रुपयात विमा संरक्षण देण्यात येणार असून यासाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत १५ जुलै, २०२४ पर्यंत आहे. शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता लवकरात लवकर आपले विमा प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

विमा सहभाग नोंदवताना आपला मोबाईल क्रमांक इलेक्ट्रॉनिक साक्षांकन करावा जेणेकरुन विमा सहभागाबाबतची माहिती एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना दिली जाईल. सीएससी. केंद्र, बँक यांनी शेतकऱ्यांकडून तलाठ्यामार्फत साक्षांकित केलेला सातबारा देण्याचा आग्रह करु नये. सीएसएसी केंद्र चालकांनी विना शुल्क विमा भरुन घ्यावा. कर्जदार शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभागी होणे अथवा न होण्याबाबत कर्ज खाते असलेल्या बँक शाखेत विहीत नमून्यात स्वतंत्र घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे. जे कर्जदार शेतकरी घोषणापत्र देणार नाहीत, त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाईल.

इच्छुक शेतकऱ्यांना अधिक माहितीसाठी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी कार्यालयात, एसबीआय. इन्शुरन्स विमा कंपनीमार्फत कार्यरत पीक विमा सुविधा व सल्ला केंद्रामध्ये, नजीकच्या बँकेत किंवा ु.षिलू. र्सी.ळप या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची ई-पीक पाहणी या मोबाईल पवर अचूक माहिती नोंदवावी. विमा संरक्षित पीक व ई-पीक पाहणीमध्ये नोंदवलेले पीक यात तफावतीचा मुद्दा उद्भवल्यास ई-पीक पाहणीमध्ये नोंदवलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येईल. कर्जदार शेतकऱ्यांनी विमा संरक्षित क्षेत्रामध्ये पीक बदलाबाबत सूचना देण्याचा अंतिम दिनांक विमा नोंदणीच्या अंतिम दिनांक विमा नोंदणीच्या अंतिम दिनांकापूर्वी २ कार्यालयीन दिवस अगोदर असेल.

शेवटच्या टप्प्यात गर्दी व घाई न करता वेळेत आपल्या अधिसूचित पिकाचे विमा संरक्षणासाठी नजीकच्या बँकेत , नागरी सुविधा केंद्रामार्फत पीक विमा संरक्षण घ्यावे, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव यांनी केले आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

लातूर : राजा नारायणलाल लाहोटी



इंग्लिश स्कूलमध्ये शुक्रवारी आंतरराष्ट्रीय योग दिन विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पालकांच्या उपस्थितीत उत्साहात उत्साहात साजरा करण्यात आला व तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत स्कूल मध्ये आयोजित योग शिबिराचा समारोप देखील शुक्रवारी करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित सकाळी स्कूलच्या प्रांगणात झालेल्या विशेष योग सत्रात सर्व वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

योग प्रशिक्षिक दीपक गटागट यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य वाढवण्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करून योगासन, प्राणायमांच्या विविध प्रकारांचे प्रात्यक्षिके सादर केले. निरोगी जीवनशैली राखण्यासाठी त्यांची लवचिकता आणि समर्पण दाखवून विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उत्साहात योग सत्रात सहभागी झाले होते. यामुळे केवळ शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन दिले नाही तर योगाचे सर्वांगीण फायदे अनुभवण्यासाठी विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ देखील प्रदान केले. योगाचा संदेश देण्यासाठी स्कूलच्यावतीने शहरातील महत्त्वाच्या प्रमुख ठिकाणी योगाचे महत्त्व अधोरेखित करणारी सुंदर मनमोहक रांगोळी देखील काढण्यात आली होती.

प्राचार्य कर्नल एस श्रीनिवासुलू यांच्या हस्ते योग प्रशिक्षक दीपक गटागट, बिभीषण मानकुसकर, नारायण साबदे, दिलीप माडेकर, अनुराधा कडेल, हरीश अग्रवाल, जगदीश हेड्डा यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन विनोद चव्हाण यांनी केले.

**नरेंद्र मोदींनी रशिया-युक्रेन युद्ध थांबवले, पण त्यांना पेपर लीक थांबवता आले नाही. भाजपा सरकराने शिक्षण व्यवस्था उद्धवस्त केलीय. न्याय्य, शिक्षण व्यवस्था कोलमडली आहे. हा मुद्दा आम्ही संसदेत मांडू.निट,युजीसी निट चा पेपर लीक झाला आहे. नरेंद्र मोदींनी रशिया-युक्रेन युद्ध थांबवल्याचे बोलले जात. मग नरेंद्र मोदी भारतात पेपर लीक का थांबवू इच्छित नाहीत.**
**- राहुल गांधी**

## रेनिसन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस जागतिक संगीत दिवस आणि वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली...

योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा या सर्वांना ईश्र्वराशी जोडणे होय. योग म्हणजे बुद्धी, मन, भावना आणि संकल्प यांचे नियमन होय. योग म्हणजे आत्म्याचे स्थिरत्व होय. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २१ जून रोजी आपल्या रेनिसन्स स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. सुरुवात सर्वप्रथम कार्यक्रमाची भारतमाता आणि डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सोबतच आज परम पूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा स्मृतिदिन असल्यामुळे त्यांचीही स्मृतीस अभिवादन करण्यात आले. तसेच आज वटपौर्णिमा सण असल्यामुळे शाळेमध्ये वडाचे वृक्षारोपण करून वटवृक्ष पूजन करून हा सण साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीत वडाच्या झाडाचे महत्त्व पावित्र्य आणि वटपौर्णिमा सणाचे महत्व इयत्ता पाचवीच्या कु. श्रीशा गव्हाळकर या विद्यार्थिनीने सांगितले. त्यानंतर इयत्ता आठवीतील कु. स्वराली पोलावर या विद्यार्थिनीने योग दिनावरील गीत सादर केले आणि इयत्ता सहावीतील चि. ध्रुव गोरे या विद्यार्थ्याने योग दिनाची माहिती सांगितली . त्यानंतर आजच जागतिक संगीत दिवस असल्यामुळे इयत्ता आठवीतील कु. मनस्वी सिरसाठ या विद्यार्थिनीने आपल्या जीवनातील संगीताचे महत्त्व आणि संगीताची गरज याची माहिती सांगितली. यानंतर शाळेतील काही मोजक्या विद्यार्थ्यांनी खेळाचे शिक्षक श्री. भूषण भावे सरांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे आसन आणि प्रात्यक्षिक यांचे सादरिकरण केले. तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी व सर्व शिक्षकांनी सूर्यनमस्कार, योगाची विविध आसने , संगीताच्या तालावर व्यायामाचे विविध प्रकार सादर करून उत्साहात योग दिवस साजरा केला. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. सई मगर या विद्यार्थिनीने केले. तर आजच्या कार्यक्रमाची सांगता संगीत दिनाच्या निमित्ताने संगीत विभागाकडून ए मलिक तेरे बंदे हम या गीताने झाली. या कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी , पालक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



## उत्तम आरोग्यासह विश्र्वशांतीसाठी योग आवश्यक -राज्यपाल रमेश बैंस

मुंबई, : योग ही भारताची जगाला अनमोल देणगी आहे. योगाच्या अमूर्त ठेव्याचे रक्षण करणे व त्याचा प्रचार - प्रसार करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य उत्तम राखण्यासह योग विश्र्वशांती प्रस्थापित करण्यास आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राजभवन मुंबई येथील दरबार हॉल येथे ‘कैवल्यधाम’ व श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूर योग या संस्थांतर्फे संयुक्तपणे आयोजित योगसत्रात राज्यपाल श्री. बैस बोलत होते. भारतीय तटरक्षक दल, सूचना प्रसारण कार्यालय व राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांनी यावेळी राज्यपालांसह योगासने केली.

भारत जगातील सर्वाधिक युवा राष्ट्र आहे. योग देशातील युवाशक्तीच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक सशक्तीकरणात मदत करून स्वस्थ भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सहायक सिद्ध होऊ शकतो, असे राज्यपालांनी सांगितले. आपण स्वतः नियमित योगासने करतो व प्रत्येक दिवस आपल्याकरिता योग दिवस असतो, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूर संस्थेचे विश्र्वस्त आत्मप्रीत रक्षित, रतन लुणावत व अल्पा गांधी तसेच कैवल्यधाम योग संस्थेचे रवी दीक्षित प्रामुख्याने उपस्थित होते. रवी दीक्षित व देवकी देसाई यांनी योगसत्राचे संचलन केले.

## शारीरिक व मानसिक सुदृढतेसाठी योग आवश्यक - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

नागपूर, : मानवी जीवनात योगासनाचे अनन्यसाधारण महत्व आहे. निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी तसेच शारीरिक व मानसिक सुदृढ आरोग्यासाठी नियमितपणे योगसाधना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले. महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे करण्यात आले होते. यावेळी श्री.गडकरी बोलत होते. आ. टेकचंद सावरकर, आ. कृष्णा खोपडे, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, अतिरिक्त आयुक्त अजय चारठानकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे प्रमुख रामभाऊ खांडवे, प्रसिद्ध आहारतज्ञ जगन्नाथ दीक्षित यांच्यासह मोठ्या संख्येने योग अभ्यासक, युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले होते. श्री. गडकरी पुढे म्हणाले की, आजची आपली जीवनशैली पूर्णपणे बदललेली आहे. आज प्रत्येकाला ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये योगसाधनेचा समावेश करणे आवश्यक आहे. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मन:शांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने निरोगी जीवन जगण्यासाठी योगसाधना करणे आवश्यक आहे. योगाच्या माध्यमातून आज रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. तत्पूर्वी, कार्यक्रमाच्या प्रारंभी शालेय विद्यार्थ्यांनी योगासनाची लक्षवेधक सामूहिक प्रात्यक्षिके सादर केली. जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे प्रमुख रामभाऊ खांडवे यांनी निरोगी जीवनासाठी योगाचे आपल्या जीवनातील अनन्यसाधारण महत्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी तर आभार क्रीडा अधिकारी पीयूष आंबुलकर यांनी मानले.




## ‘ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी’ अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, (विमाका) : वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनाया योजनेच्या लाभाकरिता अर्ज करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक)विभागाचे प्रादेशिक उपसंचालक दिलीपकुमार राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

राज्यातील मान्यता प्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र निर्वाह भत्ता योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने लाभार्थ्यींचे मूलभूत पात्रता, शैक्षणिक निकष व इतर निकष निश्र्चित केलेले आहे. त्यानुसार या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना अशा रितीने प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत लाभ देण्याची प्रक्रिया संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडून करण्यात येणार आहे.

या योजनेच्या लाभासाठी लातूर विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड व हिंगोली या चार जिल्ह्यामधील इच्छुक विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या योजनेसाठीचे अर्ज संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे पुढील वेळापत्रकाप्रमाणे सादर करावे. उच्च शिक्षणाचे व्दितीय, तृतीय, चतुर्थ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज स्वीकारण्याची तारीख २० जून २०२४ असून अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १५ जुलै २०२४ आहे. १ ऑगस्ट २०२४ रोजी निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. तर उच्च शिक्षणाच्या प्रथम वर्षासाठी ५ ऑगस्ट २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. २ सप्टेंबर, २०२४ रोजी निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित केलेल्या मुदतीत अर्ज सादर करावेत. या योजनेच्या विस्तृत अटी व शर्तींच्या माहितीसाठी संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाडे संपर्क साधावा, असेही श्री. राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## शेतकऱ्यांनी डीएपी खतास पर्यायी खते वापरण्याचे कृषी विभागाचे आवाहन

लातूर, (विमाका): चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी (डाय-अमोनियम फॉस्फेट ) खतावरच अवलंबून न राहता बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना प्रसिद्धी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र हे मृद परिक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरिता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सध्या पेरणीला सुरुवात झाली असून डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपी खतास चांगला पर्याय आहे.

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुद्धा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर पिकांसाठी पोषक ठरतो. त्याचबरोबर टीएसपी ( ट्रिपल सुपर फॉस्फेट) या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डीएपी खतास उत्तम पर्याय आहे, असे कृषी आयुक्तायाचे कृषी उपसंचालक(खते) संदीप तांबे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे २४ जून रोजी लातूर येथे आयोजन

लातूर, (जिमाका) : येथील औसा रोडवरील वाडा हॉटेलजवळील कस्तुराई मंगल कार्यालय येथे २४ जून २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे.

क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्यासह विविध कार्यालयाचे विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ या शिबिरासाठी उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये इयत्ता दहावी, बारावीनंतर काय ? भविष्यातील रोजगाराच्या संधी, व्यक्तीमत्व विकास, बायोडाटा तयार करणे व मुलाखतीची तयारी, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी याविषयी, तसेच शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देणाऱ्या बँका, विविध महामंडळे शासकीय योजनांची माहिती, कलमापन चाचणी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना व कर्ज योजना याबाबत माहिती व करिअर मार्गदर्शन तज्ज्ञ मार्गदर्शनाकडून मार्गदर्शन होणार आहे.

लातूर येथे होत असलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीरास सर्व युवक-युवती व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यंनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी कु. एम. आर. बोरुळकर यांनी केले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894